# मेट्रो ३ च्या वायूविजन पर्यावरण नियंत्रण प्रणालीचे काम ब्लू स्टार समूहाकडे

**मुंबई, प्रतिनिधी :**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं. मे. रे. कॉ)कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेंतर्गत टप्पा २ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांच्या वायू विजन (टनेल व्हेंटिलेशन आणिपर्यावरण नियंत्रण प्रणाली) यंत्रणेच्या उभारणीसाठी ब्लू स्टार लिमिटेड समूहाची निवड केली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली आहे.

या कामांमध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग इत्यादीकामांचा समावेश राहील. वायू विजन यंत्रणा (टीव्हीएस) ही महत्वपूर्ण यंत्रणा आहे. त्यामुळे बोगद्यातील हवेचे तापमान नियंत्रीत ठेवण्यास मदत होते तसेच आपत्कालिन परिस्थितीत आग व धुराचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने केले जाते. यंत्रणेद्वारे प्रवाशांना ताजी हवा मिळेल व आपत्कालीन परिस्थितीत धुराच्या निर्गमनासाठीही उपयोग होईल.

मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या की, या प्रकल्पासाठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत वायू विजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीच्या उभारणीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यामुळे मुंबईकरांना सुरक्षितरित्या प्रवास करणे शक्यहोईल.